मुख्य अभियंता (पथ) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- पथ-१०५
दिनांक:- १५/६/२०१७

मा. कार्यकारी अभियंता,
एम.एस. ई. डी. सी. एल.,
पदमावती, पुणे-४११ ०३७.

यांस...

विषय:- सातारा रस्त्यावर पर्वती इलेक्ट्रॉनिक इडेस्ट्रीयल इस्टेट ते वाळवेकर लॉन्स येथे उच्चदाब वाहिनी जोडणीकरिता एच. डी. डी. पध्दतीने रस्ते खोदाईस मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ:- १. वर्कऑर्डर आ. क्र. पथ/४७ दि.२०/०४/२०१७
२. मुख्य अभियंता (पथ) कार्यालयाकडील पत्र जा.क्र. पथ/९१ दि. १५/५/१७
२. मे. एम. एस. ई. डी. सी. एल. पुणे यांचा पथ विभागाकडील मुदतवाढ अर्ज दि.०५/०६/२०१७
३. मा. अति. महापालिका आयुक्त ठ क्र. ९/७८ दि.१४/०६/२०१७

संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये आपणास सातारा रस्त्यावर पर्वती इलेक्ट्रॉनिक इडेस्ट्रीयल इस्टेट ते वाळवेकर लॉन्स येथे उच्चदाब वाहिनी जोडणीकरिता रस्ते खोदाईबाबत परवानगी देण्यात आलेली होती. सदर परवानगीची मुदत दि.३०/०४/२०१७ पर्यंत देण्यात अलेली होती. संदर्भ क्र. २ नुसार प्रकरणी दि. ३१/५/१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली . तसेच संदर्भ क्रं. ३ नुसार उर्वरित ३५०.० र. मी. विद्युत वाहिनी टाकणेसाठी **एच. डी.डी. पध्दतीने** खोदाई करणेस मुदतवाढीची मागणी कार्यकारी अभियंता, पदमावती विभाग एम. एस. ई. डी. सी. एल. यांनी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी संदर्भ क्र. ४ च्या ठरावानुसार मा. अति. महापालिका आयुक्त (वि) यांनी फक्त **एच. डी. डी. पध्दतीने** खोदाई करणेस मुदतवाढ दिलेली आहे. त्यानुसार विषयांकित प्रकरणी दि.२७/०६/२०१७ पर्यंत उर्वरित ३५० मी. साठी फक्त **एच. डी. डी. पध्दतीने** मुदतवाढ देण्यात येत आहे. तथापि मुळ वर्कऑर्डरमधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. तसेच **एच. डी. डी. पध्दतीने** खोदाई केलेल्या पीट्सच्या ठिकाणी वाहतुकीस अडथळा होणार नाही अशा पध्दतीने बॅरीगेट्स लावणे, **एच. डी. डी. पध्दतीने** खोदाईचे काम झाल्यावर पीट्सच्या बाजूचा राडारोडा पुर्णपणे साफ करणेची दक्षता घेण्यात येऊन रस्त्यावर राडारोडा शिल्लक राहणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच पिट्सच्या ठिकाणी तातडीने रिईन्स्टेटमेंटचे काम करण्यात यावे अन्यथा नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कळावे,

प्रकाश पवार	राजेंद्र अर्धापुरे	ज्ञानेश बोरीकर
कनिष्ठ अभियंता (पथ)	उप अभियंता (पथ)	कार्यकारी अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका	पुणे महानगरपालिका	पुणे महानगरपालिका